## आपली गरज असलेले हे बालक कोणते ?

इतर अनेक बालकांसारखे, फक्त त्याला माता–पिता नसतात. त्यांच्यावर प्रेमाची पाखर घालणार कोणी नसतं. त्याच भवितव्य देखील अनिश्चित असतं.

## दत्तक घेतांना आवश्यक कागदपत्रे

* दत्तकेच्छुक दांम्पत्याचे जन्मदाखले
* विवाह प्रमाणपत्र
* दांम्पत्याला कोणताही गंभीर आजार नाही हे नमुद करणारे कुटूंबाच्या डॉक्टरकडून अथवा नोंदणीकृत व्यावसायिकाकडून घेतलेले आरोग्याचे दाखले. (विहीत नमुन्यात) H.I.V. व Hepatitis-B Test Report सह. (नमुना संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध आहे.)
* स्त्री–रोगतज्ञाचा रिपोर्ट Infertility असल्यास त्याचा उल्लेख यात असणे आवश्यक. या अहवालात दांम्पत्याने घेतलेले/घेत असलेले उपचार/उपचाराचा कालावधी, अपत्यहीनतेचे कारण अथवा डॉक्टरांचे मत व दांम्पत्याला भविष्यात स्वत:चे मुल जन्मण्याची शक्यता किती Nil / Remote / Fair याचा उल्लेख असावा.
* दत्तकेच्छूक कुटूंबाचे पोस्टकार्ड आकाराचे अलिकडचे रंगीत फोटो ५ प्रति (आधीची मुले असल्यास त्याच्यासह)
* शिफारस पत्र – विवाहीत दांम्पत्यास चांगले ओळखणाऱ्या व ते पालक या नात्याने दत्तक अपत्याची चांगली काळजी घेतील अशी खात्री देऊ शकणाऱ्या ५ व्यक्तींची पत्रे. ही पत्रे दांम्पत्ययाचे आई–वडील अथवा नजिकच्या नातेवाईकांची नसावीत.
* स्त्री किंवा पुरुष. (अविवाहीत, विधूर, विधवा, घटस्फोटीत)
* पोलीस विभागाची चारित्र्य पडताळणी अहवाल – पती–पत्नी दोघांचे (स्थानिक पो.स्टे.)
* संपत्ती विवरणपत्र – कुटूंबाच्या संपत्ती मालमत्तेचे विवरणपत्र बॉंडस्, शेअर्स, विमा पॉलिसिज, फिक्स डिपॉझिट इ. गुंतवणुक व कुटूंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्यासह.
* नोकरीचे प्रमाणपत्र – जिथे नोकरी करीत आहेत त्यांचेकडुन उत्पन्न प्रमाणपत्र, यात एकुण वेतन व निव्वळ वेतन, हुद्दा, किती काळ सेवेत आहे याचा उल्लेख असावा. पती–पत्नी दोघेही नोकरी करीत असल्यास दोघांचेही हवे. स्वत:चा व्यवसाय असणाऱ्या व्यक्तीबाबत इन्कमटॅक्स रिर्टन अथवा चार्टर्ड अकौटंटकडून व्यक्तींच्या व्यवसायाचे स्वरुप, व्यवसायाचा कालावधी व मासिक वा वार्षिक उत्पन्नाचे विवरणासह प्रमाणपत्र.
* बँक संदर्भ पत्र – दत्तकेच्छुक कुटूंबाचे सध्याचे बॅलन्स दर्शविणारे बँकेचे स्टेटमेंट अथवा पास–बुकाची प्रत

* हमीपत्र – भविष्यकाळात जर काही कारणाने अर्जदारांपैकी एकाला किंवा दोघांना दत्तक बालकाचे संगोपन करण्यास असमर्थता आली तर दत्तक बालकाचे संगोपनाची जबाबदारी स्वीकारण्याची तयारी असल्याबाबतचे लेखी हमीपत्र–प्रतिज्ञापत्र स्वरुपात, जवळच्या नातेवाईकांनी / नसल्यास मित्रांनी द्यावे. हमीपत्र देणाऱ्या व्यक्ती ४० पेक्षा कमी वयाच्या असाव्या. शक्यतोवर नातेवाईक व विवाहीत जोडप्याने हमीपत्र द्यावे. हमी पत्र १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून नोटराईज्ड करावे. हमीपत्रामध्ये हमीपत्र देणाऱ्या व्यक्तींचे पूर्ण नावे, वय, शिक्षण, व्यवसाय, उत्पन्न, कौटूंबिक तपशील आणि अर्जदाराशी नाते इत्यादी प्राथमिक माहिती असावी.